!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# रेल्वेच्या प्रलंबीत प्रश्नाबाबत मंगळवारी ( ता.२२ ) रोजी मनपाचे शिष्टमंडळ रेल्वेमंत्र्यांना भेटणार

## खासदार चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखाली रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांच्याशी चर्चा करणार

**संभाजीनगर ( ता.२० ) :** रेल्वे स्टेशन परिसरातील रेल्वेची खुली जागा मनपाच्या रस्ता रुंदीकरणाला हवी आहे. उड्डाणपुल, कमलनयन बजाज एमआयडीसी रस्ता, या विविध रेल्वेच्या प्रलंबीत प्रश्नाबाबत मंगळवारी (ता.२२) सप्टेंबर रोजी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखाली रेल्वेचे शिष्टमंडळ केंद्रिय रेल्वेमंत्री सुरेश प्रभु व रेल्वे बोर्डचे सदस्य यांची भेट घेणार आहे. या शिष्टमंडळात मनपा शहर अभियंता सखाराम पानझडे, नगररचना अभियंता डि. पी. कुलकर्णी, एमआयडिसी व रेल्वेच्या काही अधिकाऱ्यांचा शिष्टमंडळात समोवश असणार आहे.

रेल्वे स्टेशन येथे सभागृहात झालेल्या बैठकिस विभागीय रेल्वे व्यवस्थापक अखिलेशकुमार सिन्हा, महापौर त्र्यंबक तुपे, शहर अभियंता सखाराम पानझडे, नगरचना अभियंता डि. पी. कुलकर्णी, उपअभियंता अफसर सिद्दीकी, सिकंदर अली, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, छावणी उपाध्यक्ष किशोर कच्छवाह, स्टेशन मास्टर ए. सी. निकम, राजकुमार वानखेडे, महापारेषण, महानगरपालिका, रेल्वे स्टेशन, औद्योगिक वसाहत, सार्वजनिक बांधकाम यांच्याप्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. रेल्वेच्या मालकीची असलेली खुली जागा २ कोटी २९ लाख रुपयात मनपाला देण्यात यावी, महापालिका मालमत्ता कर ९८ लाख वजा करुन मनपा रेल्वेला १ कोटी २० लाख परतावा करणार असल्यांचे बैठकित ठरले. रेल्वेने ३ कोटी ५६ लाख रुपये किंमत असलेल्या या जागेबाबत रेल्वेमंत्री व रेल्वेबोर्ड यांच्या कोर्टात विषय टाकला आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे महामार्गात रेल्वेची जागा मनपाला हस्तातंरित करावी, उड्डाणपुलाल व भुमीगत गटारच्या कामांना रेल्वे प्रशासनाची परवानगी कमलनयन बजाज, एमआयडीसी ते एमटीडिसी च्या कार्यालयापर्यंतचा रस्ता, रेल्वेस्टेशनचे नागरी प्रश्न, पार्किंग पोलीस चौकी, सुरक्षा प्रवाशांच्या सोई सुविधा आदि प्रश्नांबाबत खासदार चंद्रकांत खैरे यांनी नांदेड विभागाचे विभागीय व्यवस्थापक अखिलेश कुमार सिन्हा याच्यांशी सकारात्मक चर्चा केली. या सर्व समस्या व प्रश्नांचा प्राधान्याने विचार करण्याचे आश्वासन सिन्हा यांनी दिले, लाखो लोकांचे जीव वाचणारा ट्रकमनचे शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी आभार मानले, रेल्वेला काही अवधी उरला असता ट्रक खराब झाल्याची बातमी ट्रकमन अर्जुन सानी या रेल्वे कर्मचाऱ्यांनी दिली. यामुळे रेल्वेचा मोठा अपघात टळला, मोठा अनर्थ टाळाल्याने ट्रकमनचे शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. रेल्वे प्रशासनाकडून ही रोख मदत व प्रशस्तीपत्र देऊन अर्जुनला गौरवण्यात आले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com
8421415255/9420404329

ganeshwagh4400@gmail.com
8484066606/9604384400